- भारतात पाण्याचा दुष्काळ नाही, पण बुद्धीचा मात्र आहे.
- If you love yourself, then only you can love some body else !
- संतांनी स्वतःवर प्रथम unconditional love केले. तेव्हांच ते इतरांवर प्रेम करू शकले.
- 'Self' is the 'Nature' यालाच दिव्यता म्हणतात.
- गुरुला सदैव ‘प्रमाण’ मानावे. तेथे शंका नसावी.
- गीतेच्या १६ व्या अध्यायात दिव्यता कशी प्राप्त करावी याचे मुद्देसूद वर्णन करण्यात आलेले आहे.
- ‘दिव्य’ म्हणजे ‘प्रकाश’ ! ‘दिव्यता’ म्हणजे ‘प्रकाशाने उजळून जाणे।’’

(स्वामीजींचा विषय होता - Divinity = Supreme Goal of life)

**पुढील अंकात, परिषदेचा वृत्तांत क्रमशः**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- शाखेच्या वतीने आंतरशालेय राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यासंबंधीचे निवेदन स्वतंत्रपणे शाळांना पाठविण्यात येत आहे.
- स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यान मालेअंतर्गत यंदाही १४ जुलै रोजी शाखेतर्फे गीता धर्म मंडळात व्याख्यान आयोजित करण्यात येत आहे.


**पुणे शाखेचा पत्ता**

**श्री. गो. आ. नगरकर**
‘स्वानंद’ एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
‘ईशावास्य’
प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
०९८५०९३१४१७
०९८५०८२६९९०


पुस्त डाक

प्रति

______________________

______________________

______________________

______________________



# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद सरस्वती



स्वामी चिदानंद सरस्वती


(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ११ । अंक ६
जून २०१६


## टपाल तिकीट

भारत सरकारने स्वामी चिदानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दी निमित्त खास टपाल तिकिट काढले आहे. सदर तिकीटाची किंमत ५ रु. आहे. दि. २१ मे २०१६ रोजी दुपारी ४ वाजता ऋषिकेश येथील दिव्य जीवन संघाच्या मुख्यालयात उत्तराखंडाचे राज्यपाल मा. के के. पॉल यांच्या शुभहस्ते आणि दिव्य जीवन संघाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तिकिटाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी शिवानंद आश्रमाच्या कार्य कर्तृत्वाबद्दल तसेच स्वामी चिदानंद सरस्वती यांनी जगभर जे आध्यात्मिक कार्य केलेले आहे, तसेच ऋषिकेश व आसपासच्या प्रदेशात कुष्ठ रोग निवारणासाठी अतुलनीय कार्य केलेले आहे, त्याचा सादर उल्लेख करण्यात आला.

**महिन्याचा विचार**

स्वामी चिदानंद सरस्वती जन्मशताब्दी निमित्त बडोदा (वडोदरा) येथे दिव्य जीवन संघाच्या गुजरात आणि महाराष्ट्र शाखांच्या वतीने मे ३०, ३१ आणि जून १, २०१६ रोजी आध्यात्मिक परिषदेचे आयोजन वडोदरा येथील स्वामीनारायण मंदिरात केले होते. परिषदेस साधारण २५० साधक उपस्थित होते. त्या परिषदेत विविध साधू-संतांनी व वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार संक्षिप्तपणे असे —

**दिवस पहिला (मे, ३०, २०१६)**

सकाळी ९ वाजता उद्‌घाटन समारंभाने परिषदेला सुरुवात झाली. स्वामी त्यागवैराग्यनंदांनी (भावनगर शाखा) उपस्थितांचे स्वागत करून परिषदेच्या आयोजना मागची भूमिका मांडली. स्वामी विवेकानंदांनी जसे रामकृष्ण परमहंसांचे कार्य पुढे नेले, तद्वत चिदानंदजींनी विश्वात योग-वेदांताचा प्रसार करण्याचे स्वामी शिवानंदांचे मिशन पुढे नेले असे विचार त्यांनी व्यक्त केले. मुंबई शाखेचे डॉ. सूचक यांनी स्वानुभव कथन करून गुरु कृपेचे महत्त्व अधोरेखित केले, तसेच



अवयवदान चळवळीची माहिती दिली. ऋषिकेश येथून खास या परिषदेसाठी उपस्थित असलेल्या स्वामी धर्मनिष्ठानंदजींनी - गुरु का संदेश हमारे लिए आदेश होता है। हर साँस में भगवानका दिव्य नाम याद करना चाहिए। पूर्वी देव आणि दानव या दोन वेगळ्या प्रवृत्ती होत्या असे नमूद करीत, आता मात्र दोघेही मानवात वास्तव्याला आले असून, त्यामुळे त्यांच्यातील अंतर नष्ट झाले आहे, असा दृष्टांत त्यांनी दिला. पवित्र जीवन जगण्यासाठी Spiritualization of all activities. हाच मार्ग असल्याचा संदेश त्यांनी दिला. शेवटी ते म्हणाले, ‘‘कोई भी कृत्य/कर्म - पाप या पुण्य नहीं होता । उसके पीछे की भावना हमे पाप या पुण्य तक ले जाती है।’’

यानंतर पहिल्या सत्रातील प्रमुख भाषण स्वामी परमात्मानंदजी (राजकोट) यांचे होते. त्यांचे विचार-धन -

- Service is the essence of life !
  Divinity is the greatest asset of life !
  Oneess is the fruitfulness of life !!
- धर्माचा हेतू - मानवाचे सनातनत्व व्यक्त करणे.



- भारत देश हा जगातील सर्वात पवित्र प्रांत आहे, कारण तेथे सनातन वैदिक धर्म आहे.
- मुंबईला ‘मोहनगरी’ म्हणतात, तेथे एक काळी खूप वेदपाठशाळा होत्या. आता गुगलवर सर्च करा - एकही सापडत नाही.
- सर्वजण आता धर्मक्षय/धर्महानिच्या मार्गाने निघाले आहेत. अशा वेळी ‘योगीनाम् शिवानंदोस्मि’ याची आठवण झाल्या वाचून राहात नाही.
- सनातनता म्हणजे ‘दिव्यता’ आणि दिव्यता म्हणजे ‘नित्यता !’ त्यासाठी you are the chosen ones !
- ही सनातनता कशी प्राप्त करायची हे गीता सांगते.
- पाण्याचं मूळ स्वरूप ‘स्थिर’ आहे. पण तेच जर उकळलं किंवा खूप थंड केलं तर, ‘अस्थिर’ होते. पुन्हा मूळ रुपात आल्यावरच ती बेचैनी जाते. स्वरूपात ‘स्थित’ राहाणे, आपणास जमायला हवे. स्वस्मिन तिष्ठति इति स्वस्थः।
- सनातनतेला काहीही त्याज्य नाही.
- गीतेच्या प्रत्येक अध्यायात ‘आत्मा हाच कर्ता’ मानलेला आहे.